नोटीस

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
माध्यमिक शिक्षण विभाग
माध्य/शि/०१/कावि/६५ /२०२५
दिनांक-२१/०१/२०२५

प्रति,
श्री.वायळ जयराम लक्ष्मण
(मुख्याध्यापक )
माध्यमिक विद्यालय,क्रीडाप्रबोधिनी

विषय – कामकाजात हलगर्जीपणाबाबत......

तुम्ही पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या अंतर्गत माध्यमिक विद्यालय, क्रीडाप्रबोधिनी या विद्यालयात मुख्याध्यापक या जबाबदारीच्या पदावर कार्यरत आहात. तुम्हाला मुख्याध्यापक पदाची जबाबदारी व कर्तव्य ज्ञात असणे तुम्हास आवश्यक आहे.

माध्यमिक शिक्षण विभागाने दि.०१/०१/२०२४ ची रोजी कार्यरत असलेल्या बी.एड.संर्गातील सहाय्यक शिक्षकांची प्राथमिक सेवाजेष्ठता यादी प्रसिद्ध करणेत आलेली होती, सद कालावधीत विद्यालयामध्ये श्री.चव्हाण अंकुश रामराव (सहाय्यक शिक्षक) हे कार्यरत होते.विद्यालयात दि. १४/०३/२०२४ रूजु तारखेबाबत हरकत घेतलेली होती. हरकती मध्ये श्री.चव्हाण अंकुश रामराव यांची सेवाजेष्ठता यादी मध्ये रूजु दिनांक १६/०८/२०१० अशी नमुद केलेली आहे, परंतु सेवानोंद पुस्तकात प्रत्यक्ष रूजु दिनांक – २६/०७/२०१० अशी आहे. त्यामुळे सदर रूजु तारखेत दुरूस्ती करणेबाबत तुम्ही पत्र क्र. क्रीप्रबो/०१/कावि/९०/२०२४ दि.१५/०३/२०२४ रोजी मुख्यकार्यालयाकडे रूजु तारखेत बदल करणेस शिफारस केलेली होती. त्यानुसार श्री.चव्हाण अंकुश रामराव (सहाय्यक शिक्षक) यांच्या सेवाजेष्ठता रूजु तारखेत बदल केलेला आहे. परंतु श्री.चव्हाण अंकुश रामराव (सहाय्यक शिक्षक) यांनी पुन्हा सेवाजेष्ठता यादी मध्ये रूजु तारीख १६/०८/२०१० अशी करणेबाबत विनंती केलेली आहे.

श्री.चव्हाण अंकुश रामराव (सहाय्यक शिक्षक) यांच्या मुळ सेवानोंदपुस्तकाची तपासणी केली असता रूजु तारीख १६/०८/२०१० या तारखेवर खाडाखोड करून २६/०७/२०१० असे केल्याचे दिसुन येत आहे. असे असताना देखील तुम्ही मुळसेवानोंद पुस्तक व त्यामधील रूजु तारखेच्या पानाची छायाकिंत प्रतीवर तुमच्या स्वाक्षरीने सत्यप्रत करून दिलेली आहे.वास्तविक पहाता असे निर्दशनास येते की तुम्ही सेवानोंद पुस्तक तपासणी केल्याचे दिसुन येत नाही. सदर बाब कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीकोनातुन अतिशय गंभीर स्वरूपाची आहे.

सबब,तुम्ही केलेल्या कार्यालयीन कामकाजातील हलगर्जीपणाबाबत तुमचे विरूद्ध महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम (५६) (२) (ड) नुसार कारवाई का करण्यात येऊ नये? याचा लेखी खुलासा सदर नोटीस प्राप्त झालेपासून ०७ दिवसांच्या आत विद्यालयामार्फत सादर करावा.विहीत मुदतीत खुलासा प्राप्त न झाल्यास अथवा केलेला खुलासा असमाधानकारक असल्यास तुमच्यावर उक्त नोटीसमध्ये केलेली कारवाई करण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

(विजयकुमार थोरात)
सहाय्यक आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे - १८

प्रत,

१) मा.अतिरिक्त आयुक्त (१),
मा.माहितीसाठी सविनय सादर.